# नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

७ वा मजला, फाऊंटन टेलिकॉम बिल्डींग नं., हुतात्मा स्मारक चौक, एम.जी.रोड, मुंबई ४०० ००१.

दुरध्वनी क्र.०२२-२२६२१९६८/२२६२१९७२/२२६२१९७८

ई मेल: clmms@yahoo.in, dclmms@yahoo.in, dclmms_complaints@yahoo.com


क्र.वैमाशा /परिपत्रक/वजन-माप/२०१९/२१८ दि. ३०जानेवारी, २०१९

## परिपत्रक

वजने मापे दुरुस्तक परवानाधारक संघटनेने या कार्यालयास पडताळणी मुद्रांकन काम स्विकारण्याची व सादर करण्याची राज्यात एकच कार्यपध्दती असावी अशी मागणी केली असून त्याचा विचार करुन राज्यभरात वजन वा माप पडताळणी वा मुद्रांकन कामकाज स्विकारण्याच्या/सादर करण्याच्या कामकाजात तसेच शासकीय शुल्क भरण्याच्या कार्यपध्दतीत सुसुत्रता असणे आवश्यक असल्याने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत.

१) उपयोगकर्ता त्याच्याकडील वजन वा माप यांचे पडताळणी व मुद्रांकन करणेकामी स्थानिक निरीक्षकाकडे सादर करु शकतो किंवा वजन वा माप दुरुस्त केल्यानंतर संबंधीत परवानाधारक दुरुस्तक यांनी नियमातील तरतूदीनुसार पडताळणी व मुद्रांकनासाठी सादर करणे बंधनकारक आहे. (महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ चा नियम ८ (१) (छ) (एक)).

२) उपयोगकर्ता अथवा परवानाधारक यांनी वजन वा माप यांच्या पडताळणी व मुद्रांकनाचे अर्ज/चलन/विवरणपत्र/प्रस्ताव सादर करताना खालील बाबींची पूर्तता करावी.

अ) अर्ज/चलन/विवरणपत्र/प्रस्तावावर शासकीय शुल्क ग्रास मध्ये भरणा करण्यात आल्याबाबतचा जीआरएन नंबर व दिनांक तसेच स्क्रोल नंबर व दिनांक याचा उल्लेख करावा.

ब) अर्ज/चलन/विवरणपत्र/प्रस्तावासोबत शासकीय शुल्क भरणा बाबतचा एमटीआर चलन नंबर ६ ज्यावर स्क्रोल नंबर व दिनांक याचा उल्लेख आहे अशी प्रत जोडावी.

क) उपलब्ध असल्यास एलसीआर नंबर, नसल्यास एलसीआर नोंदणीसाठीचे विवरण पत्र उपयोगकर्त्याच्या स्वाक्षरीसह.

ड) मागील पडताळणी प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक.

३) उपयोगकर्ता किंवा परवानाधारक दुरुस्तक यांनी सादर केलेल्या वजन वा माप पडताळणी व मुद्रांकनाच्या अर्जावर/चलनावर/विवरणपत्र/प्रस्तावावर **रितसर दिनांकित पोच देऊन त्याची आवक नोंदवहीवर नोंद घ्यावी** किंवा पडताळणी व मुद्रांकनासाठी प्राप्त अर्ज/चलन/प्रस्ताव यांची नोंद घेण्यासाठी वेगळी नोंदवही जिल्हा सहायक नियंत्रकाकडून प्रमाणित करुन त्यात नोंद घ्यावी.

४) उपयोगकर्त्याने स्वत: सादर केलेल्या वजन वा मापाच्या पडताळणी प्रमाणपत्रावर दुरुस्तक म्हणून स्वत: असे नमुद करावे. परवानाधारक दुरुस्तक यांनी वजन वा माप पडताळणी व मुद्रांकनासाठी सादर केले असल्यास दुरुस्तक म्हणून संबंधीत परवाना धारकाच्या आस्थापनेचे नाव, परवाना क्रमांक व चलन क्रमांक याची नोंद पडताळणी प्रमाणपत्रात घेण्यात यावी.

५) उपयोगकर्त्याने वजन वा माप सादर केल्यास संबंधीत उपयोगकर्ता त्याबाबतचे पडताळणी शुल्क व मुद्रांकन शुल्क शासनास जमा करेल व दुरुस्तक परवानाधारकाने वजन वा माप पडताळणी व मुद्रांकनासाठी सादर केल्यास मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांच्या समोरील खटला क्र.३४२/२०१५ मध्ये देण्यात आलेले आदेश व नियमातील तरतूदी विचारात घेता परवानाधारक, उपयोगकर्त्याच्या नावे नेमके पडताळणी व मुद्रांकन शुल्क शासनास जमा करु शकतो. अशा प्रकरणी शासकीय शुल्क जमा करताना त्या चलनावर दुरुस्तक परवानाधारकाने त्याच्या आस्थापनेचे नाव आणि उपयोगकर्त्याचे/आस्थापनेचे नाव नमुद करुन प्रत्येक उपयोगकर्त्यासाठी स्वतंत्र चलनाव्दारे नेमके शुल्क शासनास जमा करावे.

**वरील सुचना सर्व निरीक्षक, वैध मापन शास्त्र व परवानाधारक यांना बंधनकारक आहेत व त्या दि.१५ फेब्रुवारी, २०१९ पासून अंमलात येतील.**

उपरोक्त सुचनांचे पालन सर्व निरीक्षकांकडून होत असल्याबाबतची खातरजमा पर्यवेक्षण अधिकारी म्हणून संबंधीत जिल्हा सहायक नियंत्रक व उप नियंत्रक यांनी करावी. त्याचप्रमाणे सर्व संबधीतांना सदर परिपत्रकाची प्रत उपलब्ध करुन दयावी.

(संदीप बिश्नोई)
नियंत्रक, वैध मापन शास्त्र,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

१) सर्व उप नियंत्रक, वैध मापन शास्त्र.
२) सर्व सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र.
३) सर्व निरीक्षक, वैध मापन शास्त्र.